# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर

## गट 'क' संवर्गातील पदभरती

## जाहीर प्रकटन

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत विविध संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी मार्च -२०१९ मध्ये जाहिरात क्र. ०१/२०१९ दिनांक ०३/०३/२०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. तथापि, सदरची भरती प्रक्रिया तत्कालिन वेळेत पूर्ण झालेली नाही.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१९/आस्था-८, दिनांक २० ऑगस्ट २०२१ नुसार सदर भरती प्रक्रियेबाबत सुधारीत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार यापूर्वी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील दिव्यांग आरक्षणानुसार रिक्त पदांच्या संख्येत बदल झालेला आहे. तसेच एसईबीसी हा प्रवर्ग रद्द झाल्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणांच्या पदामध्ये बदल झालेला आहे. तसेच काही कारणामुळे माहे मार्च – २०१९ च्या जाहिरातीतील काही प्रवर्ग, समांतर आरक्षण रद्द झालेले आहेत.

वरील प्रमाणे झालेल्या बदलाचा सविस्तर तपशिल विवरणपत्र 'अ' व विवरणपत्र 'ब' मध्ये देण्यात आलेला आहे. सदर जाहिर प्रकटन विवरणपत्र 'अ' व पदभरतीकरिता सुधारीत वेळापत्रक विवरणपत्र 'ब' हे जिल्हा परिषद पालघरच्या **www.zppalghar.gov.in** या संकेतस्थळावर सविस्तर तपशिलासह प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी सर्व उमेदवारांनी वरील बाबींची नोंद घ्यावी.

स्थळ : पालघर
दि. २६/०८/२०२१

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद पालघर

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी
पालघर

Scanned with CamScanner